जा.क्र/पो.आ./ /२०२४
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
यांचे कार्यालय दि. /०६/२०२४

**प्रतिबंधात्मक आदेश**

**वाचा :- गृह विभाग क्र पीआरओ.०९१८/प्र.क्र.३२५/विशा-२. दिनांक २१ सप्टेंबर २०१८**

**विषय :- फौजदारी प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ नुसार संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी प्रस्थान सोहळा व आषाढी वारी - २०२४ च्या अनुषंगाने पालखी मार्गावर प्रतिबंधात्मक आदेश.**

**संदर्भ : - १) आळंदी पोलीस स्टेशन जाक्र/३८८४/२०२४ दि.१७/०६/२०२४**
**२) देहुरोड पोलीस स्टेशन जाक्र/१९७/२०२४ दि.१८/०६/२०२४**

ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातील श्री. संत तुकाराम महाराज पालखी सोहळा दि. २८/०६/२०२४ रोजी देहूगाव येथून निघून इनामदार वाडा देहुगाव येथे मुक्काम, दि. २९/०६/२०२४ रोजी विठ्ठल मंदीर, आकुर्डी येथे मुक्काम व दि. ३०/०६/२०२४ रोजी विठ्ठल मंदीर, आकुर्डी येथुन निघुन हॅरीस ब्रीज, दापोडी ओलांडून पुणे आयुक्तालयात जाणार आहे. तसेच श्री. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा दि. २९/०६/२०२४ रोजी निघुन गांधीवाडा दर्शन मंडप, आळंदी येथे मुक्काम दि.३०/०६/२०२४ रोजी आळंदी येथुन निघुन दिघीगाव ओलांडून विश्रांतवाडी येथे पुणे शहर आयुक्तालय हद्दीत जाणार आहे. पालखी सोहळयामध्ये महाराष्ट्र व परराज्यातून लाखोच्या संख्येने वारकरी येत असतात.

सदर यात्रा उत्सव करीता दरवर्षी संपुर्ण महाराष्ट्र व परराज्यातुन सुमारे ७ ते ८ लाख भाविक उपस्थित राहत असतात. श्री. ज्ञानेश्वर महाराज व संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळ्याचे कालावधीत आळंदी शहर व देहुगांव येथे लाखो भाविक मंदिर तसेच मंदिर परिसरात एकाच ठिकाणी एकवटलेले असतात. पालखी मार्गावर फुल, फळ, खेळणी विक्रेते हातगाड्या लावुन जमीनीवर बसुन त्यांचा माल विक्री करीत असतात. रस्त्याचे दोन्ही बाजुला त्यांचे बसण्यामुळे रस्ता वापरासाठी अरुंद मिळत असल्याने त्याचा परिणाम भाविक व दिंड्या यांना चालण्यास व रहदारीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गर्दी होवुन चेंगराचेंगरी होण्याची दाट शक्यता असते. गर्दीचा फायदा घेवून गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आपला हेतु साध्य करतात. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू शकतो.

त्याअर्थी, मी सुनिल रामानंद, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी केलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन,

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील आळंदी येथील**

३) पुणे आळंदी रोडवर आळंदी नगरपरीषद हदद प्रारंभापासुन-देहुफाटा-वाय जंक्शन- इंद्रायणी नदीचे दोन्ही पुल संपेपर्यंत

४) आळंदी शहरातील प्रदक्षिणा रोडवर चाकण चौक-धुंडरेआळी चौक-वडगाव चौक-हजेरी मारुती चौक- विठठल रुक्मिणी चौक-डॉ. आंबेडकर चौक-नगरपरीषद चौक-पी.एम.टी चौक

३) आळंदी शहरातील मरकळ चौक ते मरकळ रोडवर एस.बी.आय बॅकेपर्यंत

४) श्री. ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदीर ते घुंडरेआळी चौक, श्री. ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदीर ते चावडी चौक- हजेरी मारुती चौक, श्री. ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदीर ते नगरपरीषद चौक, चावडी चौक ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते ग्रामिण रुग्णालय पर्यंत

**पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील देहुगाव येथील**

५) संत तुकाराम महाराज मुख्य मंदीर ते चौदा टाळकरी कमान- भैरवनाथ चौक- तसेच पुढे गाथा मंदीर परीसर व समोरील रोड.

६) देहुगाव शहरातील अंतर्गत रस्ते मुख्य कमान ते इनामदार वाडा अंतर्गत रोड.

७) मुख्य कमान ते चौदा टाळकरी कमान.

८) मुख्य कमान ते काळोखे चौक रस्ता.

९) मुख्य कमान- प्राथमिक आरोग्य केंद्र-नाभिक धर्मशाळा- संत तुकाराम महाराज मुख्य मंदिरापर्यत.

तसेच संपुर्ण पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रामधील पालखी मार्गावर दिनांक २५/०६/२०२४ रोजी ००:०१ वा. ते दिनांक ३०/०६/२०२४ रोजी २४:०० वा. दरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव पालखी मार्गाचे दोन्ही बाजुला हार, फुल, फळ, खेळणी विक्रेते, हातगाडीवाले, खाद्य पदार्थ विक्रेते व सर्व प्रकारचे फेरीवाले यांना विक्री करणे, थांबणे, विक्रीस बसणे, फिरणे अथवा इतर मार्गाने तेथे उपस्थित राहण्यापासुन त्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता १८६० चे कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्याकरीता संबंधित पोलीस ठाणेचे गोपनिय शाखेचे पोलीस अंमलदार यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**सदरचा आदेश दि- /०६/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**

**दिनांक - /०६/२०२४**
**ठिकाण - पिंपरी चिंचवड.**

पोलीस आयुक्त
पिंपरी - चिंचवड

**( सुनिल रामानंद )**
**पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड**
**तथा**
**विशेष कार्यकारी दंडाधिकारी.**

**प्रत - महितीस्तव**

१) विभागीय आयुक्त, पुणे विभाग.

२) जिल्हाधिकारी, पुणे.

३) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

४) उप विभागीय प्रांत अधिकारी, खेड व हवेली

५) तहसिलदार, खेड व हवेली

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

१) अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड,

२) सर्व उप आयुक्त, पिंपरी चिंचवड

३) सर्व सपोआ, पिंपरी चिंचवड.

४) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सर्व पोलीस स्टेशन/शाखा प्रमुख, पिंपरी चिंचवड

**२/-** सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी सदर आदेशाच्या प्रती महत्वाच्या सर्वजनिक ठिकाणी चिटकाव्यात. ध्वनी क्षेपकाद्वारे किंवा अन्य मार्गाने प्रक्षेपीत करुन योग्य ती प्रसिध्दी करावी. त्याबाबत योग्य त्या नोंदी अभिलेखावर ठेवाव्यात.